महापारेषण
कार्यकारी अभियंता
महाराष्ट्र राज्य विदयुत पारेषण कंपनी मर्यादित
४००के.व्हि.ग्रहण केंद्र विभाग कोराडी-१
१३२ केव्ही पॉवरहाउस मानकापुर परीसर, नागपुर-४४००३०
मोबाईलक.-८५५४९९३५८०
ईमेल-ee4130@mahatransco.in

काअ/४०० के.व्ही/ग्रहण केन्द्र/विभाग/नाग/मांस/ 358 दिनांक : 20/06/2024

## जाहीर सुचना

औघोगिक प्रशिक्षण संस्थेतुन विजतंत्री या व्यवसायात राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद ( NCVT ) उतीर्ण उमेदवारांना सुचित करण्यात येते कि, ४०० के.व्ही.ग्रहन केंद्र विभाग कोराडी,नागपुर महाराष्ट्र राज्य विदयुत पारेषण कंपनी मर्यादित, नागपुर वर्ष २०२४-२०२५ करीता शिकाऊ उमेदवारांना एक वर्ष कालावधीसाठी करारबध्द करण्यात येणार आहे. पात्र उमेदवारांनी https://www.apprenticesshipindia.gov.in या संकेतस्थळावर शिकाऊ उमेदवारी करीता दि. २१/०६/२०२४ ते २७/०६/२०२४ पर्यंत २३:५९ वाजेपर्यंत खालील नमुद आस्थापना नोंदणी कमांकवर ऑनलाईन अर्ज सादर करावे. आस्थापना नोंदणी कमांक व शिकाऊ उमेदवारी पदांचा तपशिल खालील प्रमाणे आहेत.

| अनु क. | कार्यालयाचे नाव | रजिस्ट्रेशन कमांक | विजतंत्री (ELECTRICAN ) |
|---|---|---|---|
| १ | ४०० के.व्ही.ग्रहण केंद्र विभाग कोराडी-१,नागपुर | E10162700104 | १३ |

**१.शैक्षणिक अर्हता**

१.महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण

२.राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद ( NCVT ) नवी दिल्ली मान्यता प्राप्त औघोगिक प्रशिक्षण संस्थेतुन विजतंत्री या व्यवसायात परिक्षा उतीर्ण

**२.शैक्षणिक दस्तावेज**

१.एस.एस.सी व आय.टी. आय. विजतंत्री चार सेमिस्टरचे उतीर्ण गुणपत्रिकाची मुळ प्रत.

२.शाळा सोडल्याचा दाखला

३.आधार कार्ड

४.मागासवर्गीय विद्यार्थ्याचे जात प्रमाणपत्र

५.महाराष्ट्र राज्याचे अधिवास (Domicile) प्रमाणपत्र

६.प्रगत व उन्नत गटात मोडत नसल्याचे नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र(अजा, व अज या प्रवर्गातील उमेदवार वगळुन)

७.आर्थिक दृष्टया मागास प्रवर्ग (EWS) उमेदवाराकरीता तहसीलदार यांनी दिलेले प्रमाणपत्र व इतर सर्व अनुषांगिक आवश्यक कागदपत्राची मुळ प्रत उमेदवाराने स्वतःच्या प्रोफाईलवर स्कॅन करून उपलोड करावे.

**३.विदयावेतन** :- प्रचलित नियमाप्रमाणे लागु राहील.

**४.**नमुद पदसंख्या कमी-अधिक करण्याचे व भरती प्रकियेशी निगडीत असलेले सर्व अधिकार व्यवस्थापन राखुन ठेवित आहे व सदरचा निर्णय कोणत्याही प्रकारे उमेदवारास कळविला जाणार नाही.

५.भरती प्रकियेदरम्यान उमेदवाराने राजकीय किंवा इतर अधिका-याकडुन दबाव आणल्यास त्या उमेदवारास भरती प्रकियेतुन बाद करण्यात येईल.

६.उमेदवारांनी ऑनलाईन (Online) अर्ज करतांना पोर्टलवर आवश्यक मुळ प्रमाणपत्र व्यवस्थितरित्या (स्पष्ट दिसेल असे) स्कॅन करून योग्य रितीने अपलोड करणे बंधनकारक आहे. वरिल कालावधीत ऑनलाईन (Online) अर्ज सादर न केल्यास अशा अर्जाचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी

७.वयोमर्यादा १८ ते ३३ वर्ष मागासवर्गीयांसाठी ०५ वर्ष शिथिलक्षम.

८.एस.एस.सी. व आय.टी.आय. विजतंत्री गुणपत्रीकेवरील नाव आधारकार्ड मधील नावाशी सुसंगत असणे आवश्यक आहे, अन्यथा आपला अर्ज स्विकारला जाणार नाही.

९.ऑनलाईन (Online) अर्ज सादर करतांना उमेदवाराने सधस्थितीत कार्यान्वीत ई-मेल आय.डी (Email id) व चालु भ्रमणध्वनी कमांक नोंदविणे आवश्यक राहील.

१०.अपुर्ण चुकीचे व अपुऱ्या कागदपत्रासह सादर केलेले ऑनलाईन अर्ज स्विकारल्या जाणार नाही. अथवा त्याचा विचार केला जाणार नाही. तसेच अर्जामध्ये नमुद केलेली माहीती खोटी आढळुन आल्यास संबंधित उमेदवार अपात्र ठरेल.

११.शिकाऊ उमेदवारांची निवड ही एस.एस.सी व आय.टी. आय गुणांचा टक्केवारीनुसार तसेच सामाजिक आरक्षणाच्या अधिन राहुन प्रवर्गनिहाय केली जाईल.

१२.आरक्षणाचा लाभ घेणा-या उमेदवारास वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या शासनाच्या नियमाप्रमाणे आरक्षणासबंधीत कागदपत्राची मागणी केल्यास ते सादर करणे उमेदवारास बंधनकारक राहील.

१३.ऑनलाईन अर्ज सादर केल्यानंतर या जाहीरातीसह जोडलेला प्रपत्र अ परीपुर्ण भरुन त्यासह ऑनलाईन सादर केलेल्या अर्जाची प्रत व मुद्दा क. ०२ मध्ये मनुद आवश्यक कागदपत्रे/प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत/स्वसाक्षांकीत केलेल्या छायांकीत प्रती दि.२७/०६/२०२४ सायं.०६.०० वाजे पर्यंत कार्यकारी अभियंता ४०० के.व्ही.ग्रहण केंद्र विभाग, १३२ के.व्ही.उपकेंद्र मानकापुर परीसर, मानकापुर नागपुर कोराडी-१, नागपुर -४४००३० या पत्त्यावर पोस्टाव्दारे किंवा स्वहस्ते पोहचेल या बेताने पाठविणे अनिवार्य आहे. तसेच सदर अर्ज आवश्यक कागदपत्र/प्रमाणपत्रांसह विहीत मुदतीत प्राप्त न झाल्यास आपला अर्ज भरती/निवड प्रकियेसाठी विचारात घेतला जानार नाही, याची नोंद घ्यावी.

सहपत्रः- प्रपत्र अ

स्वाक्षरी/-
कार्यकारी अभियंता
४०० के.व्ही.ग्रहण केंद्र विभाग कोराडी-१

## प्रपत्र-अ

म.रा.वि.पारेषण कंपनी मर्यादित या कंपनीच्या कार्यकारी अभियंता ४०० के. व्ही.ग्रहन केंद्र विभाग कोराडी,नागपुर या कार्यालयाने दिलेल्या जाहिरातीस अनुसरून कारावयाचा अर्ज

उमेदवाराने अलिकडे काढलेला पासपोर्ट साईजचा फोटो येथे चिटकवावा व त्यावर स्वाक्षरी करावी ( स्टेपल किंवा पिन लावु नये )

| | | |
|---|---|---|
| १ | उमेदवाराचे पुर्ण नाव | ........................................................................ (आडनाव) (उमेदवाराचे नाव) (वडिलांचे/पतीचे नाव) |
| २ | उमेदवाराचे वडिलांचे नाव | ........................................................................ (आडनाव) (उमेदवाराचे नाव) (आजोबांचे नाव) |
| ३ | लिंग व वैवाहिक स्थिती | ............ स्त्री (Female) ............... पुरूष ( Male) ........... विवाहीत ( Married) ................ अविवाहित ( Unmarried) |
| ४ | उमेदवाराचा पत्रव्यवहाराचा पत्ता | ........................................................................<br>........................................................................<br>........................................................................<br>पिन कोड |
| ५ | उमेदवाराचा कायमचा पत्ता | ........................................................................<br>........................................................................<br>........................................................................<br>पिन कोड |
| ६ | दुरध्वनी/मोबाईल क. | ......................... कोड दुरध्वनी क. ...................... मोबार्ठल कमांक |
| ७ | ई-मेल आय. डी. | |
| ८ | जन्म दिनांक | दिनांक महिना वर्ष |

| | | अनु जाती | अनु जमाती | वि जा (अ) | भ ज (ब) | भ ज (क) | भज (ड) | विमा प्र | इमाव | ईडब्लुए स | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | जातीचा प्रवर्ग लागू असलेल्या ठिकाणी ( ) अशी खुण करावी | SC | ST | VJA | NT B | NT C | NT D | SBC | OBC | EWS | Open |
| | | | | | | | | | | | |

| | | |
|---|---|---|
| १० | अ) महाराष्ट्र शाशनाने प्रधिकृत केलेल्या समक्ष प्राधिका-यांचा जातीचा दाखला जोडला आहे काय? | होय / नाही |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ब) महाराष्ट्र शाशनाने प्रधिकृत केलेल्या समक्ष जात पडताळणी समितीने वैध केलेले जाती वैधता प्रमाणपत्र जोडले आहे का ? | | | | | होय / नाही |
| | अ)उन्नत/प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र ( Non Creamy Layer )जोडले आहे का? (SC/ST सोडुन) | | | | | होय / नाही |
| ११ | १) उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी आहे काय<br>२) महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे शाशनाने प्रधिकृत केलेल्या समक्ष अधिका-याचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile) जोडलेआहेका? | | | | | होय / नाही<br>होय / नाही |
| १२ | शैक्षणिक पात्रता : प्रमाणपत्राच्या प्रती जोडव्यात | | | | | |
| अनुक | परिक्षेचे नाव | शाळा/मंडळ /विघापीठ/ संस्थेचे नाव | परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | मिळालेले एकुण गुण | मिळालेली टक्केवारी | श्रेणी |
| १ | एस.एस.सी (१० वी ) | | | | | |
| २ | औघोगिक प्रशिक्षण संस्थेतुन विजतंत्री या व्यवसायात राष्टीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद ( NCVT) उर्त्तीण झाल्याचे प्रमाणपत्र | | | | | |

प्रतिज्ञापत्र

मी असे प्रमाणित करतो/करते कि, म.रा.वि.पा.क.मर्यादित या कंपनीच्या कार्यकारी अभियंता ४०० के.व्ही.ग्रहन केंद्र विभाग कोराडी, नागपुर यांच्या कार्यालयाने प्रस्तूत दिलेली जाहिरात मी काळजीपुर्वक वाचली असुन ती मला समजली आहे. सदर जाहिरातीत नमुद केलेल्या अटी व शर्ती मला मान्य आहे. तसेच वरील अर्जात दिलेली माहिती खरी, सपुर्ण असुन ती चुकीची व खोटी आढळुन आल्यास माझी उमेदवारी रदद होईल याची व मी कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहील, याबाबत मला, पुर्णपणे जाणीव आहे. तसेच, मी सादर केलेली कोणतीही माहिती निवड प्रकीयेच्या कोणत्याही टप्यावर खोटी अथवा बनावट आढळुन आल्यास मला निवड प्रकियेतुन बाद करण्यात येईल.

१. मी असेही प्रमाणित करतो/करते कि, माझी निवड झाल्यास मी कंपनीच्या कार्यक्षेत्रात कोणत्याही ठिकाणी रूजु होण्यास तयार आहे.
२. मी असे प्रमाणित करतो/करते कि, जाहिरातीत विहित केलेल्या अटी व शर्ती व निवड प्रकिया मला मान्य राहतील.

स्थळः-

ठिकाणः- उमेदवाराची स्वाक्षरी